International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 6.457
Vol.6 No.6 July–Aug 2019

# पंडित नेहरुंचे परराष्ट्र धोरणविषयक तत्वे आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावरील प्रभाव

**प्रा.तानाजी संभाजी माने**
**राज्यशास्त्र विभाग, प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय,वरोरा जी -चंद्रपूर ४४२९०७**
**इमेल – onlytanaji@gmail.com**

**गोषवारा:-**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था आणि परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकणारे अग्रगण्य व्यक्तिमत्व म्हणून पंडित नेहरूंचा उल्लेख केला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाला अधिक व्यापक बनवण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. त्यांनी नवभारत घडविण्याचे कार्य धर्मनिरपेक्ष राज्य, लोकशाही समाजवाद, राष्ट्रवाद, मिश्र अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना आणि उद्योगधंद्यांच्या निर्मितीवर भर इत्यादी द्वारे पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला. या सोबतच पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**मूळ शब्द:-**

परराष्ट्र धोरण, अलिप्ततावादी धोरण, साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध, जागतिक शांतता व पंचशील सिद्धांत इत्यादी.

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे परराष्ट्र विभागाच्या स्थापनेपासून ते स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे 1964 पर्यंत परराष्ट्र विभाग हा त्यांच्या नेतृत्वाखाली होता. म्हणजे जवळपास चार दशके परराष्ट्र विभाग त्यांच्याकडे होता. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंचा प्रभाव अधिक दिसून येतो. पंडित नेहरू परराष्ट्र धोरणाकडे भारताचे अस्तित्व जगामध्ये दाखवून देण्याचे एक साधन म्हणून पाहत. परराष्ट्र धोरणाची आखणी करताना आवश्यक असणारा व्यासंग, राष्ट्रहिताची व आंतरराष्ट्रीय परिस्थितीची जाणीव आणि दूरदृष्टी यासारखे गुण त्यांच्याकडे होते. आंतरराष्ट्रीय संबंध हा त्यांच्या कायम आवडीचा विषय होता. परिणामी स्वातंत्र्य पूर्वीपासूनच जागतिक परिषदा, संमेलने आणि बैठकीत सहभाग घेण्याबरोबरच त्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व विचारांचा प्रभाव टाकण्यात ते यशस्वी होत असत. यासोबतच काँग्रेसच्या अधिवेशनात परराष्ट्र धोरणविषयक ठराव मांडण्यात त्यांच्या पुढाकार राहत असत. म्हणूनच त्यांना सुरुवातीपासूनच आंतरराष्ट्रीय संबंधाचा धोरणकर्ता व परराष्ट्र धोरणाचा प्रतिपादक म्हणून स्थान प्राप्त झाले होते. याबाबत एका विश्लेषकांनी मत मांडताना म्हटले आहे की, "नेहरूंची धोरणं ही भारताची धोरणं होती आणि भारताची धोरणं ही नेहरूंची धोरणं होती." (**थरूर & सोनवणे** , २०१५, p. १४६) पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित दिशा देण्याचा प्रयत्न केला. हे प्रयत्न करीत असताना परराष्ट्र धोरणाचे आधारभूत तत्त्वे आणि उद्दिष्टे निर्धारित केली. याकरिता भारताचा गौरवशाली इतिहास, भूराजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेले स्थान, वैश्विक राजकारणातील स्थान आणि येणाऱ्या काळात घ्याव्या लागणाऱ्या संभाव्य भूमिका याबाबत त्यांना असलेल्या जाणिवा पणास लावल्याचे दिसून येते. पंडित नेहरूंनी 7 सप्टेंबर 1946 साली आकाशवाणीवरून दिलेल्या भाषणातून भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा स्पष्ट करणारी तत्वे मांडली. ती तत्वे म्हणजे, "भारताच्या परराष्ट्र धोरण आखण्याचे स्वातंत्र्य असावे. जागतिक शांतता व स्वातंत्र्यासाठी भारताने इतर देशांशी संबंध प्रस्थापित करावे. भारताने महासत्तेच्या सत्ता स्पर्धेपासून अलिप्त राहावे. भारताने वंशवाद व वसाहतवाद संपवण्यासाठी संघर्ष करावा... आणि भारताने जागतिक एकात्मता साधण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे." (**किशोर बेडकिहाळ**, २०१५, p. २०४)

एकंदरीत पंडित नेहरूंनी 'वसुदैव कुटुम्बकम' या भारतीय धोरणाला व प्रतिमेला अनुरूप परराष्ट्र धोरणाच्या सिद्धांताची पायाभरणी केली. त्यांनी अलिप्ततावादी धोरणाच्या माध्यमातून साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध, जागतिक शांतता, निशस्त्रीकरण, परस्पर सहकार्य, संयुक्त राष्ट्राचे समर्थन, पंचशील आणि तिसऱ्या जगाची बांधणी इत्यादी मूलभूत सिद्धांताची मांडणी केली. त्यांनी मांडलेल्या या सिद्धांताचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1. पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या मूलभूत तत्वाचा अभ्यास करणे.
2. पंडित नेहरूंचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:-**

1. पंडित नेहरुंचे परराष्ट्र धोरण अलिप्ततावाद, पंचशील, जागतिक शांतता, वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध इ.तत्वावर आधारित होते.
2. पंडित नेहरूंचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडला आहे.

**अध्ययन पद्धती:-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राच्या आधारावर तथ्यांचे संकलन करण्यात आली आहे. पंडित नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक, तुलनात्मक आणि गुणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्याचे विश्लेषणात्मक निर्वचन:-**

**परराष्ट्र धोरण म्हणजे काय?**

आधुनिक काळात विदेशनितीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. कारण जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही सर्व देशांना एकमेकाच्या संपर्कात येण्यास किंवा एकमेकांशी संबंध ठेवण्यास भाग पाडत आहे. म्हणून प्रत्येक राष्ट्राला आपले इतर राष्ट्रांशी येणाऱ्या संबंधाचे स्वरूप कसे असावे? हे निश्चित करणे आवश्यक ठरते. यामुळेच परराष्ट्र धोरण निर्धारणाचे कार्य हे आधुनिक राज्याचे एक महत्त्वपूर्ण कार्य बनले आहे. परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात राष्ट्रीय हीताची संकल्पना ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कारण राष्ट्रीय हित हे प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणाचा मूळ उद्देश किंवा साध्य असते. परराष्ट्र धोरणाची व्याख्या करण्याचा प्रयत्न विविध अभ्यासकांनी केला आहे. जॉर्ज मॉडेल्स्की व्याख्या करताना म्हणतात की, "परराष्ट्र धोरण म्हणजे राज्याच्या व्यवहाराची अशी विकसित पद्धती की, ज्याद्वारे एक राज्य दुसऱ्या राज्यास आपल्या इच्छेनुसार व्यवहार करण्यास सांगत असते किंवा आपल्या व्यवहाराची जुळवणी आंतरराष्ट्रीय पद्धतीनुसार करून घेत असते." (**रायपूरकर**, १९९४, p. १४८) म्हणजेच प्रत्येक देशाकडून आपल्या राष्ट्रीय हिताची सुरक्षा करणे आणि त्यात वृद्धी करणे. त्यासाठी जागतिक स्तरावरील इतर देशाच्या वर्तनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. हे घडवून आणलेले परिवर्तन आपल्याला अनुकूल होईल याची दक्षता घेतली जाते. थोडक्यात परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, देशाने आपले राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी निश्चित केलेली तत्त्वे, कार्यक्रम, उद्दिष्टे व साधनपद्धती याविषयीची स्वीकारलेली भूमिका म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख तत्वे आणि त्यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरील प्रभाव:-**

**अलिप्ततावाद:-**

पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणाबाबत मांडलेला महत्त्वपूर्ण सिद्धांत म्हणजे अलिप्ततावादाचा सिद्धांत होय. दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्तांच्या गटा-तटाच्या राजकारणामुळे निर्माण झालेले शीतयुद्ध आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांच्या राष्ट्रीय हिताच्या रक्षणासाठी पंडित नेहरूंनी अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला आणि अलिप्तता या शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग जॉर्ज लिस्का यांनी केला. अलिप्ततावादाची व्याख्या करताना अप्पादोराय म्हणतात की, "कोणत्याही राष्ट्रांसोबत लष्करी करार न करणे. विशेषत: साम्यवादी किंवा पाश्चिमात्य गटातील कोणत्याही राष्ट्रांसोबत लष्करी करारात सामील न होणे म्हणजे

अलिप्ततावाद होय." (**मिश्रा**, २०१२ , p. ७९ ) पंडित नेहरूंनी अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट करताना अशी भूमिका मांडली होती की, गुटनिरपेक्षता म्हणजे तटस्थता नाही किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा तिसरा गटही नाही तर तो शांततेच्या गट आहे. पंडित नेहरूंनी शांतता रक्षणाला परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात मध्यवर्ती स्थान दिले होते. या उद्देशाच्या पूर्ततेसाठी अलिप्ततावादाचा मार्ग स्वीकारला होता. म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्तातील शीतयुद्धामुळे तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडू नये, महासत्तातील सत्तासंघर्षाला खीळ बसावी या उद्देशाने या धोरणाचा स्वीकार करण्यात आला होता. यासोबतच भारतासारख्या नवस्वतंत्र राष्ट्राला आपला आर्थिक, औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी दोन्ही महासत्ताकडून मदत घेणे आवश्यक होते. यात पंडित नेहरूंनी अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार करून दोन्ही महासत्ताकडून आवश्यक ते सहकार्य घेण्यात यशस्वी ठरले होते.

पंडित नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाच्या जागतिक राजकारणावरील प्रभाव बाबत असे म्हटले जाते की, दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करणारी एक महत्त्वपूर्ण घटना आहे. कारण द्वितीय महायुद्धानंतर आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका खंडातील नवस्वतंत्र राष्ट्राने अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला होता. यासोबतच पंडित नेहरूंच्या या धोरणामुळे नवस्वतंत्र राष्ट्रांचे नेतृत्व भारताकडे आले होते. तसेच पंडित नेहरूंनी शीत युद्धकालीन महासत्तांच्या दोन ध्रुवीय जागतिक रचनेत तिसऱ्या जगाची अलिप्ततावादाच्या रूपात एक स्वतंत्र विश्वरचना निर्माण केली होती. ज्याची दखल अमेरिका व सोव्हिएत रशिया या महासत्तांना घ्यावी लागली होती. वरील विवेचनावरून असे म्हणता येते की, पंडित नेहरूंनी स्वीकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाचा भारताच्या परराष्ट्र धोरणाबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणावरही प्रभाव पडल्याचे दिसून येते. या धोरणावर काही आक्षेप घेतले जातात. विशेषतः 1962 साली भारतावर चीनने आक्रमण केले. त्यावेळी या धोरणावर मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली होती. असे असले तरी नवस्वतंत्र असणाऱ्या भारताबरोबरच तिसऱ्या जगातील देशांचे राष्ट्रीय हित रक्षणाच्या आवश्यकतेतून या धोरणाचा स्वीकार करण्यात आला, असे आपणास म्हणता येईल.

**पंचशील:-**

पंडित नेहरूंनी विश्वशांतीचा पुरस्कार करताना संपूर्ण जगाला पंचशीलाचा सिद्धांत दिला. या पंचशीलाला भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रमुख आधारभूत तत्त्वांपैकी एक तत्त्व मानले जाते. या तत्वात भारताचा इतिहास, भारताचे तत्वज्ञान आणि संस्कृतीच्या वारशाचे प्रतिबिंब दिसते. पंचशीलाचा सिद्धांत म्हणजे गौतम बुद्धाचे तत्वज्ञान, महात्मा गांधीजींचा अहिंसावाद, रवींद्रनाथ टागोरांचा आंतरराष्ट्रीयवाद अरविंद घोषणांचा अध्यात्मवाद आणि पंडित नेहरूंच्या लोकशाही समाजवादाचा सार होय. एकंदरीत पंचशीलाचा सिद्धांत हा भारतीय परराष्ट्र धोरणाला एक तत्त्वज्ञानात्मक आधार देतो. भारत-चीन या उभय देशांत 1954 सली करार करून पाच तत्त्वांना मान्यता देण्यात आली. ही तत्व म्हणजे, " एक, एकमेकांच्या भूप्रदेशाच्या अखंडत्त्वाचा व सार्वभौमत्वाचा आदर करणे; दोन, एकमेकांवर आक्रमण न करणे; तीन, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे; चार, समानता व परस्पर हितसंबंधांची जपणूक आणि पाच, शांततापूर्ण सहजीवन." (**गोडबोले, जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन**, २०१४ , p. १८२ ) या पंचशीलात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अनेक उद्दिष्टांचा समावेश असल्याचे दिसून येतो. तसेच जागतिक राजकारणातील भारताची भूमिका स्पष्ट करणारी ही तत्वे आहेत. 1962 साली भारतावर चीनने आक्रमण केल्यानंतर पंडित नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर व पंचशील सिद्धांतावर टीका करण्यात आली. असे असले तरी पंचशील सिद्धांतातील तत्वांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर व आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा अधिकार, आंतरराष्ट्रीय शांतता, परस्पर सहकार्य, चर्चेतून समस्या सोडविणे, राष्ट्रांचा समान दर्जा आणि हस्तक्षेप नितीचा विरोध इत्यादी तत्वांना भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात स्थान देण्यात आली, जी पंचशील सिद्धांतातील तत्त्वे आहेत. याबरोबर या तत्वांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरही प्रभाव पडल्याचे दिसून येतो. युगोस्लोव्हिया, ब्रह्मदेश, चीन, लाओस, नेपाळ व कंबोडिया इत्यादी देशांनी 1955 पर्यंत या तत्त्वांना मान्यता दिली होती.

जागतिक संघटना असणाऱ्या संयुक्त राष्ट्राच्या 1959 च्या आमसभेत या पंचशील तत्त्वांना मान्यता देण्यात आली.

**जागतिक शांतता:-**

जागतिक शांतता की शांततेचे धोरण हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वपूर्ण तत्व आहे भारताची जागतिक स्तरावर शांतताप्रिय तथा शांततावादी राष्ट्र अशी प्रतिमा राहिली आहे. यात महत्वपूर्ण योगदान महात्मा गांधी व पंडित नेहरूंचे राहिले आहे. पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना शांततेच्या तत्त्वाला सर्वाधिक महत्त्व दिले. पंडित नेहरूंनी सातत्याने जागतिक शांततेला बाधक ठरणारे युद्ध, संघर्ष, शस्त्रास्त्र स्पर्धा आणि लष्करी संघटनेचा सातत्याने विरोध केला. याउलट जागतिक शांतता, सौहार्द, सहकार्य आणि शांततामय जीवनाचा पुरस्कार केला. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठावरून आपली शांतताविषयक भूमिका सातत्याने मांडली. भारताच्या तत्कालीन नेतृत्वाने अतिशय जाणीवपूर्वक आणि राष्ट्रीय हिताला धरून जागतिक शांततेचा पुरस्कार केला. कारण पंडित नेहरू आणि तत्कालीन नेतृत्वाची अशी भूमिका होती की, भारताच्या आर्थिक विकासासाठी शांततेता आवश्यक आहे. म्हणजेच युद्ध आणि संघर्षामुळे भारताच्या राजकीय व आर्थिक विकासाला खीळ बसू शकते. यासंबंधी पंडित नेहरू म्हणतात की, "आमचे परराष्ट्र धोरण आखताना आम्ही दोन मुद्दे सातत्याने लक्षात ठेवले. एक म्हणजे कुठल्याही देशाची बदनामी टाळायची आणि दुसरी म्हणजे आपली तत्वे सांभाळून शांततेसाठी काम करीत राहायचे." (संपा.राजगोपाल & अनु., २०१६, p. १४९)

वरील दृष्टिकोनातून पंडित नेहरुंनी शेजारील देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा आणि समस्यांची शांततेच्या मार्गाने सोडवणूक करण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला. त्यांच्या या धोरणाचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. म्हणजेच पंडित नेहरूंच्या नंतर सत्तेवर आलेल्या पंतप्रधानांनी भारताची जागतिक स्तरावरील शांततावादी प्रतिमा जपली आहे. याचाच एक भाग म्हणजे भारताने आण्विक चाचण्या केल्यानंतर अशी घोषणा केली होती की, भारताकडून आण्विक अस्त्र शक्तीचा वापर युद्धासाठी केला जाणार नाही. पंडित नेहरूंच्या शांतता विषयक धोरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरही प्रभाव पडल्याचे दिसून येते. शीतयुद्धाच्या काळात दोन महासत्ता मधील संवादाअभावी आणि महासत्तांच्या सत्तासंघर्षामुळे प्रादेशिक प्रश्न चिघळे होते. अशा परिस्थितीत या दोन्ही महासत्तात संवाद निर्माण करण्याचे कार्य पंडित नेहरूंनी केले. कोरिया प्रश्न, व्हियतनाम प्रश्न इत्यादी प्रश्नांचा उल्लेख करता येईल. कोरिया प्रश्नाबाबत अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री एका मुलाखतीत (11जानेवारी 1956) म्हणतात की, "1953 व 1954 मध्ये तीन वेळा अणुयुद्ध होता होता टाळले, कारण कम्युनिस्टांच्या कोरिया, इंडोचायना व फार्मोसा येथील कारवाया थांबल्या नाहीत, तर जरूर वाटल्यास अमेरिका अण्वस्त्राचाही वापर करेल, असे सूचित केले होते... जर चीनने वाटाघाटी मोडल्या, तर अमेरिका कोरियन युद्धाला नव्याने सुरुवात करेल आणि मांचूरियावर हवाई हल्ले केले जातील, तसेच अण्वस्त्राचाही उपयोग केला जाईल." (गोडबोले, जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन, २०१४ , p. १८१ ) यावरून कोरियन प्रश्नाची दाहकता लक्षात येते. अशा प्रसंगी पंडित नेहरूंचे शांततेवर आधारित असलेल्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्व लक्षात येते.

**साम्राज्यवाद वसाहतवादाचा विरोध:-**

साम्राज्यवाद वसाहतवादाचा विरोध हे भारतीय परराष्ट्र धोरणाच्या मूलभूत सिद्धांतापैकी एक आहे. पंडित नेहरूंनी सुरुवातीपासूनच साम्राज्यवाद व वसाहतवादविरोधी भूमिका घेतली होती. कारण भारत 150 वर्ष ब्रिटिशांच्या वसाहताखाली होता. भारताने वसाहतवादाचे व साम्राज्यवादाचे दुष्परिणाम भोगले होते. यासंबंधी 1927 साली ब्रुसेल्स येथे पार पडलेल्या संमेलनात बोलताना पंडित नेहरू म्हणतात, "साम्राज्यवादाचा परिणाम काय होतो, याचा उत्तम नमुना हिंदुस्ताना शिवाय दुसरा मिळू शकणार नाही...साम्राज्यवादाच्या कोणत्याही अंगाचे दर्शन हिंदुस्तानात मिळू शकेल." (एस. & वर्मा , १९७४, p. २५७) पंडित नेहरूंनी या भाषणात ब्रिटिश साम्राज्यवादामुळे भारताचे झालेले आर्थिक शोषण, गरीबी, उपासमारी, उद्योगीकरण व शिक्षणप्रणालीचा झालेला नाश आणि इंग्रजांकडून होत असलेल्या

भारतीय सैनिकांचा गैरवापर इत्यादी दुष्परिणामांचा उल्लेख केला होता. थोडक्यात पंडित नेहरूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून वेळोवेळी वसाहतवाद आणि साम्राज्यवाद विरोधी भूमिका मांडली होती. त्यामुळे भारत आशियातील पाश्चिमात्यांच्या साम्राज्यवादाचा व वसाहतवादाचा विरोध करण्यासाठी वचनबद्ध होता. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने जागतिक शांततेच्या स्थापनेला परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात अग्रस्थान दिले आहे. जागतिक शांतता स्थापन कार्यात साम्राज्यवाद वसाहतवादाचा अडथळा होता. म्हणून भारताने जागतिक स्तरावरील राष्ट्रीय आंदोलनास पाठिंबा दिला. त्यात लिबिया, ट्युनिशिया, मलाया व अल्जेरिया इत्यादी देशातील राष्ट्रीय आंदोलनाचे समर्थन केले होते. वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की पंडित नेहरूंच्या साम्राज्यवाद व वसाहतवादविरोधी भूमिकेचा भारतीय परराष्ट्र धोरणाबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणावरही प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यांच्या या भूमिकेमुळे साम्राज्यवाद वसाहतवादाच्या शृंखलेत अडकलेली राष्ट्रे त्यांच्याकडे आशेचा किरण म्हणून पाहत होती. पंडित नेहरूंच्या प्रयत्नातून वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशवादविरोधी चळवळींना वैश्विक रूप प्राप्त झाले. या प्रवृत्तीचे निर्मूलन करणे हे भारतासोबत युनो आणि अलिप्ततावादी या संघटनांच्या उद्दिष्टाचा भाग बनला.

**समारोप:-**

पंडित नेहरूंचा स्वातंत्र्यपूर्व काळापासून जागतिक परिषदा, संमेलनातील सहभाग आणि काँग्रेसच्या विविध अधिवेशन तथा परिषदांमधून परराष्ट्र धोरण विषयक ठराव मांडण्यात पुढाकार राहिला आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधाचा धोरणकर्ता व परराष्ट्र धोरणाचा प्रतिपादक म्हणून स्थान प्राप्त झाले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात पंडित नेहरूंनी विविध भाषणातून भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा स्पष्ट करणारी तत्वे मांडली. प्रामुख्याने अलिप्ततावाद, पंचशील, जागतिक शांतता आणि वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध इत्यादी तत्वांना भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात स्थान दिले. पंडित नेहरू आणि त्यांच्या नंतरच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल वरील तत्त्वानुसार राहिली असल्याचे म्हणता येईल. यासोबतच तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी अलिप्ततावादाचा स्वीकार केला. तत्कालीन दोन्ही महासत्तानी अलिप्ततावादाच्या तत्त्वाला मान्यता दिली. यावरून असे सिद्ध होते की, या तत्वांचा तत्कालीन आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:-**

1. पंडित नेहरूंनी 'वसुदैव कुटुम्बकम' या व्यापक तत्त्वाला अनुसरून परराष्ट्र धोरणाच्या सिद्धांताची आखणी केली.
2. अलिप्ततावादी धोरणाने जागतिक राजकारणाला प्रभावित केले आहे म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर चे महत्त्वपूर्ण घटना असा त्याचा उल्लेख केला जातो.
3. पंडित नेहरूंनी स्वीकारलेल्या पंचशील सिद्धांत भारताच्या परराष्ट्र धोरणांच्या अनेक उद्दिष्टांचा समावेश होतो.
4. पंडित नेहरूंनी स्वीकारलेल्या जागतिक शांततेच्या धोरणाचे त्यांच्यानंतर सत्तेवर आलेल्या शासकांनी ही पालन केले आहे
5. पंडित नेहरूंनी अलिप्ततावादी धोरणाच्या माध्यमातून साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध, जागतिक शांतता, निशस्त्रीकरण, परस्पर सहकार्य, संयुक्त राष्ट्राचे समर्थन, पंचशील आणि तिसऱ्या जगाची बांधणी इत्यादी मूलभूत सिद्धांताचा भारताच्या परराष्ट्र धोरणात बरोबरच जागतिक राजकारणावर ही प्रभाव पडला आहे

**संदर्भसूची:-**


1. एस., स. ग., & वर्मा , अ. म. (१९७४). जवाहरलाल नेहरू वाड्.मय खंड २. नई दिल्ली: जवाहरलाल नेहरू स्मारक निधी तथा सस्ता साहित्य मण्डल प्रकाशन.
2. किशोर बेडकिहाळ, (. (२०१५). वेध नेहरूविचार विश्वाचा. मुंबई: शब्द पब्लिकेशन.

3. गोडबोले, म. (२०१४ ). जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन. पूणे: राजहंस प्रकाशन.
4. गोडबोले, म. (२०१४ ). जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन. पूणे: राजहंस प्रकाशन.
5. थरूर , श., & सोनवणे , अ. (२०१५). शोध नेहरूंचा आणि भारताचाही. पूणे: समकालीन प्रकाशन.
6. मिश्रा, म. क. (२०१२ ). अन्तराष्ट्रीय सम्बन्ध . दिल्ली : पॅसिफिक पब्लिकेशन .
7. रायपूरकर, व. (१९९४). आंतरराष्ट्रीय संबंध. नागपूर : मंगेश प्रकाशन.
8. संपा.राजगोपाल, प. व., & अनु., स. द. (२०१६). नेहरूंची सावली. पूणे : राजहंस प्रकाशन.